# लोणावळा नगरपरिषद , ता. मावळ,जि. पुणे

## भोगवटा प्रमाणपत्र

## ( Occupancy Certificate)

## ( परिशिष्ट के Bye laws No. 5.11.7 नुसार )

जा.क्र. इएनजी/बीपी/106/2011-12/ / ३९८८ दि.२१ /01/2018

प्रति,

सुखवाणी असोसिएटस् पार्टनरशिप फर्म
पार्टनर श्री. गुरुमुख सुखवाणी
द्वारा अकार असोसिएटस्, अभियंता गंगाराम मावकर
गणेश कॉर्नर, कुमार रिसॉर्ट समोर,लोणावळा, ता. मावळ,जि. पुणे.

विषय:- स.नं.22/2, वॉर्ड - वलवण, लोणावळा, ता.मावळ,जि. पुणे या जागेवरील समुह गृहबांधणी योजनेतील नियोजीत रो हाऊस बंगलो वापराच्या इमारतीस Revised & Record नकाशानुसार भोगवटा प्रमाणपत्र (Occupancy Certificate) देणेबाबत.

संदर्भ:- 1) इकडील बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्र जा.क्र. इएनजी /बीपी/106/2011-12/ 3429 दि. 31/03/2012

2) अकार असोसिएटस्, अभियंता गंगाराम मावकर , लोणावळा, ता. मावळ,जि. पुणे.यांचा भोगवटा प्रमाणपत्र मिळणेबाबतचा दि.29 /12/2017 रोजीचा अर्ज.

3) G.A.Bhilare, Consultants Pvt. Ltd , Chartered Engineer India (License M-145316/5) गौरीनंदन ,प्लॉट नं.13, शांतीशिला सोसायटी, पुणे-4 यांचे दि.10/11/2017 रोजीचे स्थैर्य प्रमाणपत्र (Stability Certificate)

4) अकार असोसिएटस्, अभियंता गंगाराम मावकर, लोणावळा, ता. मावळ, जि.पुणे यांचेकडून अंतिम निलमुद्रीत नकाशे प्राप्त दि. 22/01/2018.

वरील संदर्भिय विषयास अनुसरुन आपणास कळविणेत येते की, लोणावळा नगरपरिषद कार्यक्षेत्रातील जमिन स.नं.22/2, वॉर्ड - वलवण, लोणावळा,ता.मावळ,जि. पुणे या जागेवरील समुह गृहबांधणी योजनेतील नियोजीत रो हाऊस बंगलो वापराच्या इमारतीस Revised & Record नकाशानुसार भोगवटा प्रमाणपत्र (Occupancy Certificate) मिळणेबाबत संदर्भिय क्र. 2 अन्वये आपण विनंती केली आहे.त्या अनुषंगाने प्रत्यक्ष जागेवरील बांधकामाची पाहणी केली असुन पाहणी केलेल्या बांधकामाचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | इमारत प्रकार | पुर्व मंजूरी नुसार | जागेवरील रेकॉर्ड नकाशानुसार बांधकाम | इमारतीची उंची |
|---|---|---|---|---|
| 1 | रहिवास वापर बंगलो इमारत<br>बी-1, बी-2,बी-3 | तळमजला + 1 | तळमजला + 1 | 6.79 मी. |

विषयांकीत बांधकामास लोणावळा नगरपरिषदेने कार्यालयीन जा.क्र.इएनजी/बीपी/106/2011-12/3429 दि. 31/03/2012 अन्वये बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्र मंजूर केलेले होते. तसेच संदर्भ क्र. 3अन्वये आपण इकडे इमारत स्थैर्य प्रमाणपत्र (Stability Certificate) सादर केलेले आहे.त्या अनुषंगाने आपणास खालील अटी व शर्तीस अधीन राहुन भोगवटा प्रमाणपत्र देण्यात येत आहे.

अटी व शर्ती:-

| | |
|---|---|
| 1. | नियोजीत रहीवास वापराची इमारत मंजूर नकाशात /रेकॉर्ड नकाशात विशिष्ट उद्दिष्टासाठी दर्शविलेनुसारच वापरात आणणे आवश्यक आहे. |
| 2. | अर्जदार / विकासक / वास्तुविशारद / अभियंता यांनी सादर केलेली कोणतीही माहिती / कागदपत्रे ही चुकीची अथवा दिशाभूल करणारी आढळुन आल्यास देण्यात आलेले भोगवटा प्रमाणपत्र रद्द करणेत येईल. तसेच अर्जदार / विकासक /अभियंता यांचेवर महाराष्ट्र प्रादेशिक नगर रचना अधिनियम 1966 व महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरे अधिनियम 1965 मधील तरतुदीनुसार कार्यवाही करणेत येईल. व त्यात नमुद केल्यानुसार भोगवटा प्रमाणपत्रामध्ये बदल करणे किवा रद्द करणेचे अधिकार निम्न स्वाक्षरीकार यांनी राखून ठेवेलेले आहेत. |
| 3. | आकडेमोडीमध्ये काही चुक आढळल्यास त्याची सर्व जबाबदारी अर्जदार / वास्तुविशारद / अभियंता यांची राहील. |
| 4. | सदर नियोजीत रहीवास वापराच्या बंगलो इमारतीस G.A.Bhilare, Consultants Pvt. Ltd, Chartered Engineer India (License M-145316/5) गौरीनंदन ,प्लॅाट नं.13,शांतीशिला सोसायटी, पुणे-4 यांचेकडील पत्र क्र. GABCPL/ LONAVLA/HN/COMP/ 1203 /2012/ B1,B2,B3 दि. 10/11/2017 रोजीचे स्थैर्य प्रमाणपत्र (Stability Certificate) सादर केले आहे. त्यांनी नमुद केलेनुसार बांधकामाचे स्थिरतेबाबत, बांधकामाबाबतचा दर्जा व गुणवत्तेबाबत संपुर्ण जबाबदारी Chartered Engineer यांचेवर राहील. |
| 5. | परिशिष्ट ' जे ' मध्ये वास्तुविशारद यांनी बांधकाम पुर्णत्वाचे प्रमाणपत्र इकडे सादर केले असून त्या अनुषंगाने त्याची जबाबदारी वास्तुविशारद यांची राहील. |
| 6. | अर्जदार यांना उक्त इमारतीमधील सार्वजनिक जागा उदा.पार्कींग, टॉप टेरेस इ.बंदीस्त करता येणार नाही. अथवा विकता येणार नाही. सदरचा एरिया सर्व लोकांसाठी खुला ठेवणे अर्जदार यांचेवर बंधनकारक राहील. |
| 7. | रेखांकनातील सर्व रस्ते आजुबाजुच्या नागरीकास व लगतच्या भुखंडधारकास वापर करता येईल. |
| 8. | मंजूर बांधकाम नकाशा व्यतिरिक्त जागेवरील बांधकाम स्वखर्चाने काढून टाकणेची सर्वस्त्री जबाबदारी अर्जदार यांची राहील. |
| 9. | प्रस्तावित बांधकामाबाबत /विकासाबाबत भविष्यात छाननी शुल्क, विकास शुल्क व कामगार कल्याण उपकर बाबतच्या रकमेची बाकी उदभ्वल्यास सदर रक्कम लोणावळा नगरपरिषदेकडे जमा करणे अर्जदार / विकासक /जमीनमालक /वास्तुविशारद /अभियंता यांचेवर बंधनकारक राहील. |
| 10 | लोणावळा नगरपरिषदेस लागु असलेल्या प्रचलित बांधकाम विकास नियंत्रण नियमावलीनुसार विषयांकीत बांधकामास मंजूरी दिली असून बांधकामाची जागेवर पाहणी केली असता बांधकाम मंजूर नकाशानुसार असून भारतीय प्रमाणकानुसार सुरक्षिततेच्या सर्व निकषांचे पालन करुन प्रस्तुत बांधकामाची सर्व जबाबदारी जमिनमालक / विकासक / सुपरवाईझर व संबंधित अभियंता / वास्तुविशारद यांची संयुक्तीक राहील. |

लोणावळा नगरपरिषद कार्यालयास आपण सादर केलेल्या कागदपत्रांच्या / माहितीच्या आधारे करमुल्य निर्धारण करण्यात येईल.

मुख्याधिकारी
लोणावळा नगरपरिषद

सहपत्र - रेकॉर्ड नकाशा
प्रत-
कर अधिक्षक- लोणावळा नगरपरिषद

My Com/D/12345/Gosavi/O.C./ Eng.Mavkar